# पुण्यातील कचरा

३१ जानेवारी

रूपाली घाटे

GreenEarth Social Development Consulting Pvt. Ltd.
contactus.greenearth@gmail.com

(कचरा व्यवस्थापनाच्या नीलप्रतीसाठी)

# पुण्यातील कचरा

## समस्या

- कचऱ्यावर प्रक्रीया नाही: शहरात दर रोज १३०० ते १४०० मेट्रिक टन कचरा तयार होतो. त्यातील फक्त १००० मेट्रिक टनावर प्रक्रिया केली जाते[1]. सर्व कचरा गोळा करण्यासाठी व गोळा झालेल्या सगळ्या कचऱ्यावर प्रक्रीया करण्यासाठी मनपाकडे अनेक प्रयत्न करूनही आज पुरेशी यंत्रणा नाही. पुणे शहरातील वेगवेगळ्या प्रवर्गांमध्ये खालीलप्रमाणे कचरा निर्माण होतो.

| Category | Solid Waste generated (%)[2] |
|---|---|
| Households | 76.28 |
| Restaurants | 16.72 |
| Shops & commercial units | 3.50 |
| Hotels | 2.47 |
| Theaters | 0.69 |
| Hospitals | 0.33 |

- कचऱ्याचे वर्गीकरण होत नाही: जरी कचऱ्याचे वर्गीकरण करणे बंधनकारक आहे, तरीदेखिल मनपाकडे येणारा कचरा ओला व सुका असा वेगळा करून येत नाही, यामुळे कचऱ्याची विल्हेवाट लावायला अडचण येते.
    - उरळी देवाची येथे दोन वर्षांपूवीर् कचऱ्यासाठी झालेल्या आंदोलनानंतर महापालिकेने ओला-सुका कचरा वगीर्करणाची मोहीम राबविण्यास सुरुवात केली. यासाठी विविध माध्यमांतून जागृतीही केली. विविध सोसायट्यांना नगरसेवकांनी दोन स्वतंत्र कचरापेट्याही उपलब्ध करून दिल्या, पण या बाबतीतही नव्याच्या नवलाईप्रमाणे प्रारंभीचा काळ कौतुक झाले. आता पुन्हा सत्तर टक्के सोसायट्यांनी याकडे दुर्लक्ष केले असून कचरा वगीर्करण बंद

---
[1] ESR 2009-10
[2] The Times of India, 30/08/2011 (Research carried out By Somaiyya College, Mumbai)

पडले आहे. कचरा उचलण्यासाठी येणाऱ्या गाड्यांमध्ये एकत्रित कचरा न देणाऱ्याच्या संख्येत पुन्हा वाढ झाली आहे[3].

- <u>कचरा डेपो साठी जागा नाही</u>: आज मनपाकडे कचरा टाकायला जागा नाही. उरळी देवाचीच्या गावकऱ्यांनी मनपाला कचरा डेपो दुसरीकडे हलवण्यासाठी १५ डिसेंबर २००९ पर्यंतची मुदत दिली होती, पण मनपाला आजपर्यंत पर्यायी व्यवस्था करायला जमले नाही.
    - ऊरुळी देवाची येथील आंदोलनांमुळे शहराच्या ४ भागात कचरा प्रकल्प सुरू करण्याचा प्रस्ताव होता, त्यानुसार तुळापूर-वढू, येवलेवाडी येथील जागा महापालिकेने घेतल्या. या ठिकाणीही नागरिकांनी विरोध केल्याने कचरा प्रकल्प कार्यान्वित होऊ शकला नाही त्यामुळे भविष्यात जागा मिळविणे महापालिकेसाठी अवघड आहे[4].

ऊरुळी देवाची आणि फुरसूंगीच्या गावकऱ्यांनी वारंवार आंदोलने करून देखील इथला कचरा डेपो हलवण्यात पुणे महापालिकेला यश मिळाले नाही. या ठिकाणी कचऱ्यावर प्रक्रिया करणारा प्रकल्प आहे[5].

- मे २००८ मध्ये त्यांच्या गावाजवळच्या कचरा डेपोत कचरा टाकण्यास फुरसुंगी व उरळी देवाचीच्या गावकऱ्यांनी मनाई केल्यामुळे ८ दिवस ८००० टन कचरा शहरात पडून होता. पुन्हा हीच परिस्थिती केव्हाही उद्भवू शकते.
- <u>२१ डिसेंबर २०११ पासून ग्रामस्थांनी पुन्हा आंदोलन केले होते व डेपो मध्ये येणाऱ्या कचऱ्याच्या गाड्या अडवल्या. हे आंदोलन ५ दिवस चालले</u> - कचरा डेपोचा त्रास उरुळी व फुरसुंगी ग्रामस्थांना होत असल्याने महापालिका व शासनाने विविध आश्वासने दिली होती. मात्र या गावांना शुद्ध पाण्याच्या पुरवठ्याबाबतीत दिलेले आश्वासन पाळण्यात आलेले नाही[6]. या काळात ३ दिवसात २५०० टन[7] कचरा तर चौथ्या दिवशी ४००० टन[8] कचरा शहरामध्ये साठला होता.

---

[3] 19 Dec 2011, महाराष्ट्र टाईम्स, चैत्राली चांदोरकर, पुणे

[4] सकाळ, ९ डिसेंबर २०११

[5] http://www.indianexpress.com/news/uruli-devachi-phursungi-villagers-dont-budge-garbage-stalemate-on/460255/0

[6] http://articles.timesofindia.indiatimes.com/2011-12-26/pune/30558178_1_processing-plant-hanjer-processing-garbage

[7] Pune Mirror, December 24, 2011

[8] Times of India, December 25, 2011

- <u>डेपोजवळ राहणाऱ्या लोकांच्या समस्या</u>: गावातल्या कचरा डेपो मुळे फुरसुंगी व उरळी देवाचीच्या गावकऱ्यांना आज अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते - 'नागरी घन कचरा नियम २०००' प्रमाणे सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे पालन होत नाही. या नियमानुसार कचरा मोकळ्या जागेत न टाकता कचऱ्याचे वर्गीकरण करून त्यावर प्रक्रिया करण्याची गरज आहे. त्यामुळे काही वर्षांनंतर कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारण्यात आले. तरीही कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावली जात नाही. त्यामुळे मोकळ्या जागेत टाकण्यात आलेल्या कचऱ्यामुळे परिसरात मोठ्या प्रमाणावर दुर्गंधी पसरण्याबरोबरच पाणीदेखिल दूषित झाले आहे. पावसाळ्यामध्ये दूषित पाणी वाहत येते. परिणामी गावकऱ्यांना अनेक प्रकारच्या आजारांचा सामना करावा लागतो[9].

  २००९ मध्ये गावकऱ्यांनी म.न.पा कडून रक्कम रु. १० कोटींची नुक्सान भरपाई पुढील २५ वर्षांसाठी मागितली होती[10]. पण ही रक्कम एकून १० वर्षांसाठी आहे किंवा दर वर्षी २५ कोटी याबाबत शंका आहे.

  २०११-१२ च्या बजेटनुसार या गावांना देण्यात आलेल्या आश्वासनानुसार पहिल्या टप्प्यातील विकास कामे पूर्ण झाली आहेत व दुसऱ्या टप्प्यातील कामे हाती घेण्यात आली आहेत. फुरसुंगी व उरळी देवाची या गांतील उर्वरित विकास कामे पूर्ण करण्याकरता रक्कम रू. २४ कोटी सुचविण्यात आलेली आहे.

  तसेच कॅपिंगसाठी देखिल आवश्यक त्या रकमेची तरतूद सुचविण्यात आलेली आहे, पण हे काम अद्याप सुरू नाही झाले[11].

  The civic body has spent Rs. 42 crore on development work for the benefit of the residents around the depot. The civic body has proposed to spend Rs. 126 crore more on development works, including capping of garbage[12].

- <u>ई-कचऱ्याची विल्हेवाट नाही</u>: दर वर्षी शहरात सुमारे ५००० टन ई-कचरा जमा होतो. त्याची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी म.न.पा ने येवलेवाडी येथे ई-कचऱ्याचा प्रकल्प सुरू करण्याचा प्रस्ताव २००८ मध्ये होता, पण आता तो मागे पडला आहे[13]. याच्या वरून असे लक्षात येते की या समस्येकडे आज कोणीही गंभीरपणे पहात नाही[14].

---

[9] पुणे वृत्तान्त, २१ डिसेंबर २०११, पुणे/ प्रतिनिधी

[10] http://www.indianexpress.com/news/uruli-devachi-phursungi-villagers-dont-budge-garbage-stalemate-on/460255/0, मे १३, २००९

[11] http://www.sakaaltimes.com/sakaaltimesbeta/20120109/5679725851001514942.htm

[12] Pune Mirror, December 24, 2011

[13] सकाळ, ९ डिसेंबर २०११

[14] http://www.expressindia.com/latest-news/fresh-rules-for-managing-electronic-waste/397470/

या शिवाय कचरा गोळा करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्याही आरोग्यविषयक व working conditions विषयक समस्या आहेत. तसेच मोठया प्रमाणावर रोजच्या वापरात असलेल्या प्लॉस्टिकची विल्हेवाट लावण्याची व हॉस्पिटल्स मधून निर्माण होणारा कचरा (bio-medical waste) आरोग्यास धोकादायक असल्याकारणाने त्याचे विघटन योग्य होत आहे ना हे पाहण्याचीदेखील गरज आहे.

The apathy PMC shows towards biomedical waste is cited in the news extract below.

> PMC collects fines from city hospitals if they are found violating government regulations against open dumping of biomedical waste. However medical waste from the Kamla Nehru Hospital which is run by the civic body was dumped right in front of the main gate of the hospital. The Health Officer of PMC said that this waste was not toxic in nature and since the building is undergoing modernization, all the material from the laboratory was kept near the gate[15].

तसेच, कचरा वाहतुक करणाऱ्या वाहनांकरता जी.पी.एस यंत्रणा बसविण्याचा निर्णय झाला होता, पण अद्याप कार्यवाही पूर्ण झाली नाही[16].

## मनपाचे प्रयत्न (updated as on February २०१०)

फुरसुंगी व उरळी देवाची येथील कचरा डेपो बंद पडल्यावर शहरातल्या कचऱ्याचे काय करायचे यासाठी मनपाचे खालील नियोजन आहे:

1. वॉर्डातच कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी मनपा १४ वॉर्डात जागेच्या शोधात आहे (जागा घेऊन काय करणार आहे हे स्पष्ट नाही, मात्र स्थानिकांचा जागा देण्यास विरोध आहे).
2. ओल्या कचऱ्यातून खत निर्मिती करणारे ३ प्रकल्प (प्रत्येकी १०० टन रोज) योजिले आहेत (केव्हा, कसे, किती खर्चात, इ तपशील मिळाला नाही).
3. ओला कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी १०-१२ वॉर्डांमधे वीज निर्मिती करणारे बायो गॅस प्रकल्प राबवण्यात येणार आहेत. प्रत्येक प्रकल्प रोज ५ टन कचऱ्याचे विघटन करून २५० किलो खत व २५०-३०० युनिटची वीज निर्मिती करेल, जी रस्त्यांवरील दिवे लावण्यासाठी वापरली जाईल. या प्रत्येक प्रकल्पाचा खर्च रु. ४८ लाख आहे. यातील २ प्रकल्प वानवडी व मॉडेल कॉलनी येथे नुकतेच कार्यान्वित झाले आहेत, व बाकी ९ प्रकल्प फेब्रुवारी २०१० पर्यंत चालू होणे अपेक्षित आहेत.

---

[15] Pune Mirror, December 17, 2011
[16] सकाळ, ९ डिसेंबर २०११

4. The civic body is planning to set up a gasification plant to treat garbage. The plant will take 700 metric tonne of waste and generate 12 MW of electricity. The work of setting up the plant is nearly 70% complete. It was to become functional by the end of September 2011[17].

5. मनपाच्या प्रयत्नांतून खालील प्रकल्पांचे काम चालू असल्याचे समजते

| अनु क्र. | ठिकाण | वॉर्ड | क्षमता (टन) | प्रकल्पाचा प्रकार | कंपनीचे नाव | आजची स्थिती (as of February 2010) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | औंध | औंध | ५ | | मेल्हॅम | primary & secondary digesters completed |
| २ | रोहित नगर, बावधन | कर्वे रस्ता | ५ | बायोगॅस | एम्प्रोटेक | काम पूर्ण |
| ३ | जे. प्लॉट कोठी | घोले रस्ता | ३ | बायोगॅस | डेक्कन एनव्ही | काम पूर्ण |
| ४ | मॉडेल कॉलनी | घोले रस्ता | ५ | बायोगॅस | एम्प्रोटेक | काम पूर्ण |
| ५ | Yerawada Housing Board Colony | येरवाडा क्षेत्रीय कार्यालय | ५ | बायोगॅस | मेल्हॅम | base slab has been completed |
| ६ | पेश्वे पार्क | विश्रामबागवाडा | ५ | बायोगॅस | मेसर्स ग्रीनलीफ | काम पूर्ण, ४ टन खताची निर्मिती |
| ७ | कात्रज रॅम्प | धनकवडी | ५ | बायोगॅस | मेसर्स ग्रीनलीफ | काम पूर्ण |
| ८ | राजीव गांधी बागेसमोर | धनकवडी | ५ | बायोगॅस | मेसर्स ग्रीनलीफ | secondary digesters in process |
| ९ | कचरा रॅम्प | हडपसर | ५ | बायोगॅस | आद्य एनव्हा | work on all primary digesters in process |
| १० | कचरा रॅम्प | हडपसर | ५ | बायोगॅस | एम्प्रोटेक | civil work completed |
| ११ | वानवडी स्मशान भूमी | बिबवेवाडी | ५ | बायोगॅस | मेसर्स विवम | काम पूर्ण |
| १२ | संभाजी पार्क | घोले रस्ता | २ | mechanical | एक्सेल | काम चालू |
| १३ | नॅन्सी गार्डन सोसायटी | धनकवडी | २ | mechanical | एक्सेल | काम चालू |
| १४ | अरण्येश्वर नाला बाग | सहकारनगर | २ | mechanical | सेव्ह एनव्हा | जागा बदलण्यासाठी परवानगी मागितली आहे |

[17] Times of India, September 5, 2011

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १५ | तळजाई वसाहत | सहकारनगर | २ | mechanical | साई टेक | काम चालू |

हे सर्व प्रकल्प राबवल्यावर एकूण ५०९ टन कचऱ्यावर प्रक्रिया होऊ शकणार आहे, पण शहरातला सर्व १००० टन कचऱ्याची व्यवस्था होत नाही हे उघड आहे.

२००५ साली केंद्र शासनाच्या नगर विकास खात्याच्या प्रयत्नांने सेल्को (रोज ५०० टन) व हंजर बायोटेक (रोज २०० टन) या दोन कंपन्यांना उरळी देवाची येथील कचऱ्यावर प्रक्रीया करणारे प्रकल्प उभारण्यासाठी रु. १८ कोटीचा निधी देण्यात आला. यातील रु. ८.५ कोटी मनपाने दिले. हे प्रकल्प २००७ साली कार्यान्वित देखील झाले, पण आज हे दोन्ही प्रकल्प बंद आहेत / प्रकल्पांची पूर्ण क्षमता वापरात नाही. या संदर्भात कोर्टात वाद चालू आहे.

बातम्या व इतर संदर्भ पाहता पालिकेने केलेल्या स्पष्टीकरणातून प्रत्येक वेळी वेगवेगळी आकडेवारी समोर येत आहे. पालिकेचे नेमके नियोजन त्यामुळे समजत नाही.

एकीकडे हे नवीन प्रकल्प चालू करण्याच्या प्रयत्नात असतानाच नवीन कचराडेपोसाठी जागा शोधण्याची धडपड सुद्धा पालिका करत आहे! पालिकेने निवडलेल्या जागांना पर्यावरण खात्याची परवानगी न मिळाल्यामुळे (ही ठिकाणे गुप्त ठेवण्यात आली आहेत कारण नाहीतर स्थानिक लोकांचा विरोध होईल).

मनपाने सर्व वार्ड 'कंटेनर-फ्री' करणार असल्याचे जाहीर तर केले, पण पालिकेकडे घरोघरी जाऊन कचरा जमा करण्यासाठी पुरेशी यंत्रणा नाही. यासाठी पालिकेने सर्व नगरसेवकांकडून ३० ऑक्टोबर २००९ पर्यंत घंटा गाडीची सोय करण्याबाबत प्रस्ताव मागितले होते. पण फक्त ३ नगरसेवकांनी असे प्रस्ताव दिले. आज पालिकेकडे फक्त ८९ घंटा गाडया व १००० हातगाडया आहेत.

मोठया सोसायटयांकडून ओला कचरा घेणार नसल्याचे धोरण मनपाने जुलै २००३ ला जाहीर केले. सोसायटयांनी स्वतःचे गांडूळ प्रकल्प राबवून कचऱ्याची विल्हेवाट जागीच लावणे अपेक्षित होते. हे करण्यासाठी (व सोलर वीज व पावसाचे पाणी अडवण्यासाठी) पालिकेने ७९२१ सोसायटयांना रु. ३७.५ लाख एवढी कर सवलत देऊ केली. याचा लाभ घेऊन सुद्धा ओला कचऱ्याची विल्हेवाट जागच्याजागीच लावण्यास एखाद दुसरा अपवाद वगळता बहुतांष सोसायटया असमर्थ ठरल्या.

कचऱ्याच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्याच्या दृष्टीने घनकचरा व्यवस्थापनासाठीचे ५५० कर्मचारी असणारे स्वतंत्र खाते स्थापन करण्याचा निर्णय पालिकेने स्थायी समितीच्या बैठकीत नुकताच घेतला आहे. मात्र गेल्या काही वर्षांपासून हा प्रश्न भिजत राहिलेला असल्याने स्वतंत्र खाते स्थापन केल्यावर तरी खरच हा प्रश्न सुटणार आहे का या विषयी संभ्रम वाटणे साहजिक आहे.

एकूणच काय, तर पालिकेचे प्रयत्न तोकडे पडत आहेत हेच यावरून स्पष्ट होत आहे.

## इतर काय करत आहेत?

- पुणे कॅन्टोनमेंट बोर्डाचा वार्षीक कचरा १४,५०० टन एवढा आहे. या सर्व कचऱ्याचे विघटन करण्यासाठी त्यांचा ४० टन प्रति दिवस क्षमतेचा गांडूळखत निर्मीतीचा प्रकल्प आहे. परिसरातल्या ऊस लावणाऱ्या शेतकऱ्यांना हे खत पुरवण्यासाठी बोर्डाने शेतकऱ्यांसोबत करार केला आहे. आता घरोघरी जाऊन कचरा गोळा करण्यासाठी बोर्ड खास योजना तयार करीत आहे.
- कोलकता शहराने त्यांच्या कचरा संकलन केंद्राचे नुतनीकरण करण्यासाठी ए.डी.बी. बँकेकडून ऑक्टोबर २००९ मधे रु. ४५ कोटी घेतले आहेत.
- पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर कचराकोंडीच्या स्थितीचा मागोवा घेता येतो (Waste Carrier Truck Management Solution from TMT)!

## समस्येला हात घालण्याचे काही मार्ग

- <u>तातडीचे व अत्यंत महत्वाचे</u>: लवकरच शहरासमोर कचऱ्याची समस्या जाणवणार आहे हे लक्षात घेऊन पालिकेकडे या संदर्भात पाठपुरावा करून वेळीच योग्य व पुरेसे नियोजन करण्यास व त्याप्रमाणे अमलबजावणी करण्यास पालिकेला भाग पाडू शकतो. <u>हे आपत्ती व्यवस्थापनाच्या पातळीवरच करावे लागेल</u>.
- आपल्या वॉर्डातल्या सोसायटयांशी बोलणी करून ओला कचऱ्याची जागीच विल्हेवाट लावण्यासंदर्भात जनजागृती व मदत करू शकतो व असे प्रकल्प राबवण्यासाठी त्यांना भाग पाडायला हवे.
- आपला वार्ड कंटेनर-मुक्त करण्यासाठी जातीने लक्ष देऊन कचरा जमा करण्यासाठीची व्यवस्था पुरेशी आहे ना (उदा. घंटा गाडी) हे पाहायला हवे (यासाठी मनपाकडे बजेट आहे, पण स्थानिक नागरिकांना सोबत घेऊनही हा प्रयत्न होऊ करावा लागेल).

- ई-कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी पुढाकार घेऊन काही पथदर्शक काम उभे करू शकतो (या संदर्भात कॅलिफोर्निया सारख्या शहराने २००३ साली कायदा केला आहे – संदर्भ: http://www.ciwmb.ca.gov/electronics/Act2003/).
- फुरसुंगी व उरळी देवाची साठी मान्य केलेली रकम त्या गावांना मिळेल ह्यावर लक्ष ठेवायला हवे, व ही रकम या गावांना कचरा डेपो मुळे होणाऱ्या समस्यांपासून मुक्त होण्यासाठी वापरली जाईल यासाठी मदत करायला हवी.

## इतर संदर्भ साहित्य:


१. पर्यावरण सद्य-स्थिती अहवाल २००८-९, २००९-१०

२. Strategic Environment Assessment – Scoping Report (पुणे महानगर पालिका)

३. Rough Notes

४. बातम्या